# विदेशी भाषा विभाग उद्योग-विद्यापीठातील दुवा : शिर्के



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभागातर्फे 'अ क्रॅश कोर्स इन जापनीज लँग्वेज अँड कल्चर' या नव्या अभ्यासक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के.

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

विदेशी भाषा विभाग हा कोल्हापुरातील औद्योगिक क्षेत्र व विद्यापीठ यामधील सांस्कृतिक दुवा ठरू शकतो. शैक्षणिक व औद्योगिक संस्थांत ज्ञान, संशोधन व सेवा यांची देवाणघेवाण ही दोन्ही क्षेत्रांना समृद्ध करणारी अत्यंत महत्त्वाची बाब आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभागातर्फे 'अ क्रॅश कोर्स इन जापनीज लँग्वेज अँड कल्चर' या नव्या अभ्यासक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी अध्यक्ष म्हणून ते बोलत होते.

याप्रसंगी गोकुळ शिरगाव एमआयडीसी येथील मेनन बेअरिंग्ज लि.चे संचालक अरुण आराध्ये प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. जपान व इतर देशांशी मेनन बेअरिंग्ज लि.चे व्यापारी संबंध निर्माण झाल्यानंतर संस्थेचे अधिकारी व इंजिनिअर कंपनीच्या कामानिमित्त परदेशी जातात. तेव्हा तेथील वास्तव्यात स्थानिक लोकांशी संवाद साधण्यात भाषेचा अडसर येतो. तसेच तेथील सांस्कृतिक जीवनाचा परिचय असणे अत्यावश्यक ठरते. त्यांची भाषा समजत असेल तर परदेशात लोक अधिक आत्मीयता दाखवतात, असा अनुभव आहे. कंपनीची ही गरज लक्षात घेऊन विदेशी भाषा विभागाने जपानी भाषा व संस्कृती अभ्यासक्रम तयार केला, ही अतिशय समाधानकारक बाब आहे. त्याचा कंपनीच्या स्टाफसाठी नक्कीच फायदा होईल, अशी भावना अरुण आराध्ये यांनी व्यक्त केली.

विभागाच्या प्र-विभागप्रमुख डॉ. मेघा पानसरे म्हणाल्या, या नव्या अभ्यासक्रमात जपानी लिपी व दैनंदिन वापरातील अभिव्यक्ती, इतिहास, भूगोल व सांस्कृतिक जीवन, तसेच औद्योगिक परिभाषा यांचा परिचय करून दिला जाणार आहे. भविष्यात कोल्हापुरातील उद्योग क्षेत्रासाठी असे नवीन अभ्यासक्रम तयार करून विदेशी भाषा विभाग हा विद्यापीठ व औद्योगिक क्षेत्रातील एक महत्त्वाचा दुवा बनेल. रोपाला पाणी घालून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी मेनन बेअरिंग्ज लि.चे प्रशासकीय अधिकारी पवन देसाई, इंजिनिअर व जपानी भाषेचे विद्यार्थी उपस्थित होते. जपानी भाषा शिक्षिका स्नेहल शेट्ये यांनी आभार मानले.

# प्रतिभानगरात भूजलात वाढ

## शिवाजी विद्यापीठ परिसरातील ३२ कोटी लिटर पाणीसाठवणुकीचा परिणाम

सकाळ वृत्तसेवा

**टेंबलाईवाडी, ता. २४ : शिवाजी विद्यापीठाने २०१५ पासून जलसंधारणाचे विविध उपक्रम राबवले. यामुळे विद्यापीठात दरवर्षी सुमारे ३२ कोटी लिटर पाणी साठवले जाते. यामुळे विद्यापीठातील पाण्याची गरज पूर्ण झाली. विद्यापीठाची जलस्वयंपूर्ती झाली. तसेच प्रतिभानगर, अंबाईडिफेन्स या भागांतील कूपनलिकांच्या पाणी पातळीतही वाढ झाल्याचे येथील नागरिकांच्या निदर्शनास आले आहे. विद्यापीठात मोठ्या प्रमाणात पाणी मुरवल्याने या परिसरातील भूजलपातळी वाढली आहे, असा येथील नागरिकांचा दावा आहे.**



शिवाजी विद्यापीठ : विद्यापीठातर्फे जलसंधारणाची कामे केल्याने झालेला पाणीसाठा.

शिवाजी विद्यापीठाच्या जागेवर पूर्वी कोल्हापुरातील काही घराण्यांची शेतजमीन होती. पावसाळी पिके घेऊन झाली की नंतर या जमिनीचा उपयोग गवतासाठी व्हायचा. जलसंधारणाच्या दृष्टीने ही जागा अत्यंत महत्त्वाची आहे. काहीशा उतारावर हा माळ पसरल्याने पावसाचे पाणी अपोआप खालच्या ओढ्याला येऊन मिळते. सुमारे ८०० एकर जागेवरील पाणी पूर्वी वाहून जायचे. नैसर्गिकपणे जमिनीत मुरायचेही. २०१५ मध्ये कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी या परिसरात जलसंधारणाची कामे करण्याचा निर्णय घेतला. आराखडा तयार करून प्रत्यक्ष कामाला सुरवातही झाली. पाहता पाहता विद्यापीठाच्या माळावर ७ शेततळी बांधण्यात आली. तसेच ५ विहिरी खोदण्यात आल्या. समतल चर खोदून पावसाचे पाणी मुरवण्यासाठी प्रयत्न केले गेले. वृक्षारोपणाने येथील वनराईही वाढली. वृक्षांनी सावलीबरोबरच मृदा संधारणाचे कामही केले. पावसाळ्यात जुन्या पुणे-बेंगलोर महामार्गावरील शाहू नाक्यापासूनचे पाणी विद्यापीठाने संकलित करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे शेततळी भरली. विहिरी ओसंडून वाहू लागल्या. हे साठवलेले पाणी शुद्ध करून विद्यापीठात वापरले जाते. सुमारे ३२ कोटी लिटर पाणी साठवले जाते. त्याचबरोबर येथे जमिनीत मोठ्या प्रमाणात पाणी मुरवले गेले.

**जलसंधारणाचे काम हे बहुआयामी आहे. यामुळे पाण्याच्या बाबतीत शिवाजी विद्यापीठ स्वयंपूर्ण झाले. या जलसंधारणामुळे भूगर्भातील पाणी पातळीही वाढली. काही नागरिकांनी याबद्दल समाधान व्यक्त केले. विद्यापीठातील जलसंधारणाचा यशस्वी प्रयोग अनेकार्थाने उपयुक्त ठरला आहे.**

- डॉ.व्ही.एन.शिंदे, कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ

या वर्षी उन्हाळ्यात शिवाजी विद्यापीठाच्या खालच्या भागात असणाऱ्या प्रतिभानगर आणि अंबाई डिफेन्स परिसरातील विहीर आणि कूपनलिकांच्या पाणी पातळीत वाढ झाल्याचे निदर्शनास आले. काही ठिकाणी कूपनलिकांचे पाणी अटले होते, मात्र अशा कूपनलिकांनाही पावसाळ्यात पाणी आले. विद्यापीठातील दोन विहिरींमधील पाणी पातळी एवढी वाढली आहे की डिसेंबर अखेरही पाणी विहिरीतून वहात आहे. विद्यापीठातील जलसंधारणामुळे भूगर्भातील पाणी पातळी वाढली असल्याचे नागरिक सांगतात; मात्र याची शास्त्रीय पद्धतीने पाहणी करण्याची आवश्यकता आहे.

पुढारी

# विद्यापीठ, महाविद्यालयांकडून 'नॅक'ची जय्यत तयारी




**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठ व संलग्नित काही महाविद्यालयांनी नॅशनल ॲसेसमेंट अँड ॲक्रिडिशन कौन्सील (नॅक) कडून तपासणीसाठीची जय्यत तयारी सुरू केली आहे. 'नॅक'च्या पार्श्वभूमीवर महाविद्यालयांमध्ये कागदपत्रांच्या पूर्तता व बैठकांचे सत्र सुरू आहे.

दर पाच वर्षांनी महाविद्यालये, विद्यापीठांना 'नॅक' तपासणीला सामोरे जावे लागते. महाविद्यालयाची शैक्षणिक गुणवत्ता, पायाभूत सुविधा, दर्जा या गोष्टींच्या आधारे मूल्यांकन केले जाते. शिवाजी विद्यापीठांतर्गत संलग्नित सुमारे २९३ महाविद्यालये आहेत. यापैकी काही महाविद्यालयांनी 'नॅक'कडून मूल्यांकन व फेरमूल्यांकन करून घेतले आहे. यातील काही महाविद्यालयांना 'अ, ब' मानांकन प्राप्त झाले आहे.

नव्या वर्षात सुमारे ५० हून अधिक महाविद्यालयांचे 'नॅक'कडून मूल्यांकन होणार आहे. महाविद्यालयांकडून प्रस्ताव पाठविण्यात येत आहेत. महाविद्यालयात 'नॅक'ची कमिटी आल्यानंतर विद्यापीठाच्या प्रतिनिधीस बोलावण्यात येते. त्यानंतरच महाविद्यालयाची 'नॅक'ची मूल्यांकन तपासणी पूर्ण होते.

शिवाजी विद्यापीठ 'नॅक' मूल्यांकनाची तयारी अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या वतीने सुरू झाली आहे. 'नॅक'ला सादर करावयाच्या स्वयंअध्ययन अहवाल तयारीची लगबग सुरू आहे. याबाबत विद्यापीठाने 'नॅक'ला पाठवलेल्या पत्रास मान्यता मिळाली आहे. फेब्रुवारी २०२० मध्ये स्वयंअध्ययन अहवाल 'नॅक'ला सादर करण्यात येणार असल्याची माहिती डॉ. आर. के. कामत यांनी दिली.

# विद्यापीठात उद्या खंडग्रास सूर्यग्रहण पाहण्याची सुविधा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

या वर्षातील शेवटचे खंडग्रास सूर्यग्रहण गुरुवारी (दि. २६) कोल्हापूरकरांना पहायला मिळणार आहे. सकाळी ८ वाजून ४ मिनिटांपासून ग्रहणाला सुरू होणार असून ९ वाजून २३ मिनिटांनी सर्वात जास्त म्हणजे ८४ टक्के सूर्याचा पृष्ठभाग झाकला जाणार आहे. सकाळी १० वाजून ५९ मिनिटांनी ग्रहण पूर्णपणे संपणार आहे.

कंकणाकृती सूर्यग्रहण दक्षिण भारतातून व सौदी अरेबिया, ओमान, श्रीलंका व इंडोनेशिया इत्यादी ठिकाणावरून दिसणार आहे. जेव्हा चंद्र पृथ्वीपासून त्याच्या सर्वाधिक लांब अंतरावर राहून सूर्य आणि पृथ्वीच्या मध्ये येऊन सूर्याच्या प्रकाशाला झाकून टाकतो तेव्हा कंकणाकृती सूर्यग्रहण बघायला मिळते. सूर्यग्रहणात चंद्र जास्त अंतरावर असल्यामुळे तो सूर्याला पूर्णपणे झाकू शकत नाही. अशावेळी सूर्याची वर्तुळाकार कडी चंद्राच्या पाठीमागे दिसते. शिवाजी विद्यापीठाच्या अवकाश संशोधन केंद्रातर्फे स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी अधिविभागाच्या छतावरून सूर्यग्रहण पाहण्याची व निरीक्षणांची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे, अशी माहिती अवकाश संशोधन केंद्राचे समन्वयक डॉ. राजीव व्हटकर यांनी दिली.